महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:सीबीटी-०६२२/प्र.क्र.१४/२०२२/३१ दिनांक : २१ एप्रिल, २०२६

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- प्रवेश प्रमाणपत्राबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी नियोजित खाली नमूद संवर्गाच्या संगणक प्रणालीवर आधारित परीक्षांकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या https://mpsconline.gov.in संकेतस्थळावरील त्यांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत :-

| अ.क्र | जाहिरात क्रमांक | संवर्ग | परीक्षा दिनांक व वेळ | परीक्षा केंद्र |
|---|---|---|---|---|
| १ | ४८/२०२३ | सहायक प्राध्यापक, स्थापत्य अभियांत्रिकी, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ | २७ एप्रिल, २०२६<br>सकाळी ०९:०० ते १०:००<br>सामायिक चाळणी परीक्षा | मुंबई,<br>छ. संभाजीनगर,<br>व नागपूर |
| २ | ४९/२०२३ | सहयोगी प्राध्यापक, स्थापत्य अभियांत्रिकी, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ | | |
| ३ | ५०/२०२४ | नगररचनाकार, महाराष्ट्र नगररचना व मुल्यनिर्धारण सेवा, गट-अ | २७ एप्रिल, २०२६<br>दुपारी १२:०० ते ०१:०० | मुंबई |
| ४ | ४१०/२०२३ | सहायक प्राध्यापक, दंतपरिवेष्टनशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, गट-ब | २७ एप्रिल, २०२६<br>दुपारी ०३:०० ते ०४:००<br>सामायिक चाळणी परीक्षा | मुंबई |
| ५ | ४११/२०२३ | सहायक प्राध्यापक, दंतविकृती व अणुजीवशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, गट-ब | | |
| ६ | ४१३/२०२३ | सहायक प्राध्यापक, मुखशल्यचिकित्साशास्त्र, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, गट-ब | | |

**२.** परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी परीक्षेच्या प्रत्येक सत्राकरिता आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**३.** परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्‌भवू शकणा-या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान **दोन तास** अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी **अर्धा तास** अगोदर परीक्षा कक्षातील स्वत:च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**४. परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.**

**५. परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीने उमेदवारास केवळ परीक्षेस आवश्यक असलेले साहित्य/वस्तुच (पेन, प्रवेश प्रमाणपत्र, मुळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत) परीक्षा कक्षात बाळगण्यास परवानगी असेल. परीक्षेस आवश्यक साहित्या व्यतिरिक्त इतर साहित्य/वस्तु (चावी, जॅकेट, पॉकेट, पर्स, बॅग, चैन, अंगठी अथवा अन्य मौल्यवान आभूषने इत्यादी) परीक्षा कक्षात बाळगता येणार नाहीत.**

**६.** आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना', प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना, परीक्षेच्या वेळी शारीरिक / परस्पर अंतराच्या (Social Distancing) अनुषंगाने करावयाची कार्यवाही / उपाययोजना संदर्भातील सूचना यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणा-या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसारही कारवाई करण्यात येईल.

**७.** प्रवेशप्रमाणपत्र मिळण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in किंवा support-online@mpsc.gov.in या ईमेलवर आणि / अथवा ७३०३८२१८२२ किंवा ०२२६९१२३९१४ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**८.** संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षांकरीता उमेदवारांना सराव करता यावा यासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Computer Based Examinations > Mock Test' येथे एक वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर मॉकटेस्ट ही केवळ सरावासाठी असुन प्रत्यक्ष परीक्षेचा कालावधी व गुण संबंधित परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार असेल.

ठिकाण : नवी मुंबई

सरिता बांदेकर-देशमुख,
सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग